Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# स्वातंत्र्यपूर्व काळातील परभणी जिल्ह्यातील न्यायदान पद्धती

**म्हस्के कडूबा भिमराव**
संशोधक विद्यार्थी (इतिहास)

## प्रस्तावना :

"स्वातंत्र्यपूर्व काळातील परभणी जिल्ह्यातील न्यायदान पद्धती" हा माझा शोध निबंधाचा विषय असून स्वातंत्र्यपूर्व काळात परभणी जिल्ह्यात जी न्यायदान पद्धती होती ती मध्ययुगीन कालखंडाला जुळणारी होती. मोगल राजवटीत न्यायदानाला अतिशय महत्त्व होते. खास काजी नेमलेले असत. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर निजाम-ऊल-मूल्क हैदराबादचा सत्ताधीश झाल्यानंतर मोगलकालीन न्यायसंस्थेची जी घटना होती तीच निजामाने चालू ठेवली होती. सर्वसाधारण एकोणविसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत जिल्ह्यात दिवाणी आणि फौजदारी न्यायासंबंधीचे अधिकार महसूल अधिकारी म्हणजेच तालुकदार, मामलेदार आणि पाटील यांच्याकडे सोपविलेले होते. हैदराबाद संस्थानात न्यायदानाकरिता स्वतंत्र अशी न्यायदान व्यवस्था नव्हती.

थोडक्यात परंपरा आणि रूढी यांच्या आधारे न्यायदान पद्धती रूढ होती. खेडेगावातील किरकोळ बाबींचे न्यायदान गावचे पाटील करीत होते. परंतु पाटलांनी दिलेला निकाल प्रतिवाद्यांना मान्य नसल्याने त्याबाबत पुढील सुनावणी पाटलांच्या पंचायतीसमोर होत असे.[१]

एखादा वाद निकाली निघाला नाही तर त्याची सुनावणी मामलेदारापुढे चालत होती. न्यायदानाचे अंतिम अधिकार सुभेदाराला होते. त्यांनी दिलेला निकाल अंतिम समजला जात असे. गरीब प्रजेला दिलेल्या कर्जाची जबरीने वसुली अरब आणि रोहिले यांच्या मदतीने केली जात होती. कर्ज वसूल करताना कोणत्याही मार्गाचा अवलंब केला जात होता. या जुलमी पद्धतीला कायद्याने पायबंध घातला नव्हता. इतकेच नाही तर शासन याकडे दुर्लक्ष करीत होते. वारसा हक्क, जहागिरी, पैशाचे व्यवहार इत्यादी प्रकारच्या खटल्यावर निकाल देण्यासाठी काजी यांना अधिकार दिले होते. अशा परिस्थितीत सुद्धा सामान्य गरीब प्रजा न्यायापासून वंचित राहत असे.[२]

परंपरेनुसार शिक्षा सुनविण्याचे अधिकार सुभेदाराला होते. परंतु त्यानंतर हे अधिकार मामलेदारांकडे सोपविण्यात आले होते. हैदराबाद संस्थानातील बंडखोर आणि अट्टल गुन्हेगार यांना

फाशी देण्यात येत होती. खुन व मारामाऱ्या करणाऱ्या गुन्हेगारांना जबर शिक्षा केली जात होती. गुन्हेगार गरीब असल्यास त्याला स्वतंत्र करावासाची शिक्षा होत असे. शिक्षा देताना गुन्हेगारांची जात, त्यांच्या परंपरा आणि त्यांचे समाजातील स्थान या गोष्टी विचारात घेतल्या जात होत्या.[३]

१८४५ मध्ये हैदराबाद संस्थानात नवाब सिराज-ऊल-मुल्क यांच्याकडे पंतप्रधान पद आले तेव्हा त्याच्या कारकिर्दीत दाव्यांच्या रकमेवर दरसाल १२ टक्के व्याज आकारणी केली जात होती. फौजदारी गुन्हेगारी करता शिक्षा ठरविण्यासाठी न्यायाधीशांची नेमणूक करण्यात येत होती. नवाबाच्या कारकिर्दीत प्रत्येक जिल्ह्याचे न्यायविषयक काम मुन्सीफ आणि आदिल करीत असत.[४] हुशार व लायक काजींची मुन्सीफ आणि मीर आदिल या पदावर नेमणूक केली जात होती. त्यांनी दिलेला न्याय अंतिम समजला जात होता. परंतु काही महत्त्वाचे खटले मात्र हैदराबाद येथील फौजदारी अदालतीसमोर फेरतपासणीसाठी पाठवण्यात येत असत. जिल्हा न्यायालयात दिवाणी आणि फौजदारी खटल्यांचा निकालासंबंधी नियमांची मार्गदर्शिका तयार करण्यात आली होती.[५]

सालार जंग यांनी पंतप्रधानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रथमच प्रशासकीय विभागाबरोबर न्यायालयीन कामकाजात मुलगामी सुधारणा अमलात आणल्या. १८५५ मध्ये मुन्सीफ आणि मीर आदिल यांची दिवानी दावे आणि फौजदारी खटल्यांची चौकशी करण्यासाठी नेमणूक केली. न्यायालयाचे निकाल कार्यवाही आणण्यासाठी कार्यक्षम अशा पोलीस दलाची जरुरी होती. अशा प्रकारची नियमितपणे काम करणारे पोलीस दल शासनाकडे नव्हते. परंतु प्रत्येक तालुकादारांच्या अधिकारात निजामत मधील १०० ते २०० पोलीस नियुक्त केले जात होते.

बंडखोरी, चोरी, गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी १९५८ पासून सुसज्ज फोज तयार करण्यात आली होती. फौजांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी हैदराबाद येथे एक नियामक मंडळाची स्थापना करण्यात आली होती.[६] परभणी जिल्ह्यात १९०० मध्ये नाझीम-इ-दिवानी किंवा दिवाणी न्यायाधीश हा दिवाणी न्यायालयाचा प्रमुख असल्याचा उल्लेख आढळतो. त्याच्या मदतीला सहाय्यक मुन्सीफ न्यायालय होती. प्रथम तालुका हा जिल्ह्याचा मुख्य दंडाधिकारी आणि जिल्हा दिवाणी न्यायाधीश हा संयुक्त दंडाधिकारी म्हणून प्रथम दंड्याधिकाऱ्याच्या गैरहजेरीत आपल्या अधिकाराचा

वापर करीत होता. द्वितीय आणि तृतीय तालुकदार अशा सात तहसीलदार यांना द्वितीय आणि तृतीय न्याय अधिकाऱ्याचे अधिकार होते.[७]

यानंतरच्या काळात न्यायदान विभागाची बरेच ठराव करण्यात आले. न्यायशाखा १९२१ पर्यंत स्वतंत्र नव्हती. महसूल विभागांमध्ये न्यायदान करण्याची धारणा होती. तथापि १९२१ मध्ये स्वतंत्र न्याय शाखा निर्माण करण्यात आली. जिल्हा न्यायालयाच्या प्रमुखपदी जिल्हा आणि सत्र न्यायाधीशाची नेमणूक करण्यात आली.[८]

थोडक्यात मराठवाडा विभाग महाराष्ट्र राज्यात विलीन करण्यात आल्यानंतर परभणी येथील पूर्वीच्या सत्र अदालतचे जिल्हा व सत्र न्यायालयात रूपांतर करण्यात आले. थोडक्यात वरील प्रमाणे परभणी जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्वकाळात न्यायदान पद्धती अस्तित्वात होती.

## संदर्भ सूची :


१. महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर - परभणी जिल्हा पृ.क्र. ४७८

२. कित्ता - पृ.क्र. ४७९

३. कित्ता - पृ.क्र. ४८०

४. गडकरी अमृत - हैदराबाद मुक्ती संग्रामातील एक पर्व, पृ.क्र. १६

५. भालेराव अनंत - हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, पृ.क्र. ४२

६. कुरंदकर नरहर - हैदराबाद विमोचन आणि विसर्जन, पृ.क्र. ८६

७. काळे भगवान - मराठवाडा काल आणि आज, पृ.क्र. ६२

८. पोतदार वसंत - हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम, पृ.क्र. १०२